आधुनिक शहरातील घडामोडी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

e Paper

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in

शनिवार दिनांक 14/02/२०२6

METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 60 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com

# राष्ट्रवादीचे विलीनीकरण होणार?

## तटकरे यांचा शिंदेंच्या विधानावर आक्षेप

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या संभाव्य विलीनीकरणाच्या चर्चेला पुन्हा एकदा उधाण आले आहे. पक्षाचे शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी 'राष्ट्रवादी' मासिकात लिहिलेल्या लेखात विलीनीकरणाचा मुद्दा अधोरेखित केला आहे.**



शिंदे यांनी आपल्या लेखात नमूद केले की, 12 फेब्रुवारी रोजी शरद पवार यांच्या उपस्थितीत दोन्ही राष्ट्रवादी गटांचे विलीनीकरण करण्याचा निर्णय झाला होता. तसेच विलीनीकरणानंतर पक्षाची संपूर्ण जबाबदारी अजित पवार यांच्याकडे सोपवण्याचा निर्णय सर्व नेत्यांच्या संमतीने घेण्यात आला होता, असा दावा त्यांनी केला. मात्र या विधानावर अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी तीव्र आक्षेप घेत संताप व्यक्त केला आहे. पत्रकार परिषदेत बोलताना तटकरे म्हणाले की, शिंदे यांच्या लेखातील काही उल्लेख तथ्यहीन आणि दिशाभूल करणारे आहेत.

सुनील तटकरे यांनी शिंदेंच्या लेखातील काही उल्लेखावर आक्षेप घेतला. ते म्हणाले, "थोडी वाक्य आहेत, 'अदृश्य शक्तीच्या कारवाया, धमक्या व खोट्या नाटे षडयंत्र रचून केलेल्या आरोपांमुले अजितदादांना राष्ट्रवादीतून बाहेर पडून वेगळा गट स्थापन करावा लागला होता, याची आपल्याला जाणीव आहे, पंरतू झालेली चूक पुन्हा दुरुस्त करायची या विचाराने दादा मागील चार-पाच महिन्यांपासून कामाला लागेले होते.' यावर माझा खूप आक्षेप आहे", असे तटकरे म्हणाले.

या घडामोडींमुळे राष्ट्रवादीतील अंतर्गत मतभेद पुन्हा एकदा चव्हाट्यावर आले असून, विलीनीकरणाचा मुद्दा पुढील काळात राजकीय चर्चेचा केंद्रबिंदू ठरण्याची शक्यता आहे.

# शहीदी समागमासाठी नागरिकांशी समन्वय ठेवा-महापौर



## महापौर रवि लांडगे यांच्या सूचना

**पिंपरी : 'हिंद-दी-चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या 350 व्या शहीदी समागमाच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड शहरातून सहभागी होणाऱ्या नागरिकांसाठी आवश्यक त्या सोयीसुविधांचे सुयोग्य नियोजन करावे. समागमासाठी जाणाऱ्या नागरिकांच्या प्रवास, समन्वय, सुरक्षितता तसेच जनजागृती मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वय ठेवावा, अशा सूचना महापौर रवि लांडगे यांनी दिल्या. याशिवाय, समागमाच्या अनुषंगाने विविध सामाजिक संघटनांच्या प्रतिनिधींकडून प्राप्त सूचनांची दखल घेत महापालिका स्तरावर आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन देखील त्यांनी यावेळी दिले.**

'हिंद-दी-चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या 350 व्या शहीदी समागमाच्या निमित्ताने आयोजित करण्यात येणाऱ्या भव्य कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने महापौर रवि लांडगे यांच्या अध्यक्षतेखाली पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीमधील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृहात समन्वय बैठक संपन्न झाली, त्यावेळी ते बोलत होते.

या बैठकीस उपमहापौर शर्मिला बाबर, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, उप आयुक्त अण्णा बोदडे, ममता शिंदे, संदीप खोत, राजेश आगळे, क्षेत्रीय अधिकारी किशोर ननवरे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, प्रशासन अधिकारी संगीता बांगर, राजू कांबळे, कार्यकारी अभियंता दिवेकर के. बी, मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल, सहाय्यक सुरक्षा अधिकारी प्रमोद निकम यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते सुनिल चटोले, मोहन बिलडान, नरेंद्र तानर, गुरुमलसिंह, सुरिंदर सिंह नडीवाल, गुरुविंदरसिंह गिल, गोबिंदसिंह धावडा, एम. टी. भोरे तसेच विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी व संबंधित विभागांचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या 350 व्या शहीदी समागमाचा भव्य कार्यक्रम 28 फेब्रुवारी व 1 मार्च 2026 रोजी नवी मुंबईतील खारघर येथे आयोजित करण्यात आला असून, या कार्यक्रमास पिंपरी चिंचवड शहरातील शीख, सिकलकर, बंजारा, लबाना, सिंधी, महोयाल, वाल्मिकी, उदासीन तसेच भगत नामदेव (वारकरी) संप्रदायासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहून गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या कार्य व बलिदानाच्या इतिहासाला उजाळा देणार आहेत.

या पार्श्वभूमीवर आयोजित बैठकीत समागमाच्या आयोजनाची रुपरेषा, विविध सांस्कृतिक व धार्मिक कार्यक्रमांचे नियोजन, तसेच आवश्यक प्रशासकीय समन्वय याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी विविध सामाजिक संघटना, धार्मिक संस्था व समाज प्रतिनिधी यांचे सहकार्य अत्यंत महत्त्वाचे असल्याचे महापौर रवि लांडगे यांनी यावेळी स्पष्ट केले.

बैठकीदरम्यान उपस्थित सामाजिक कार्यकर्त्यांनी शहरातील विविध भागांमधून समागमासाठी जाणाऱ्या नागरिकांच्या प्रवासासाठी सुयोग्य नियोजन करून समन्वय ठेवण्याची आवश्यकता व्यक्त केली.

तसेच 'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या 350 व्या शहीदी समागमाच्या निमित्ताने शाळांमध्ये वकृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, गायन स्पर्धा आदी कार्यक्रमांचे आयोजन करावे, जेणेकरून विद्यार्थ्यांमध्ये गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या बलिदानाची प्रेरणा रुजेल, अशी सूचना आली.

समागमासाठी शहरातून जाणाऱ्या नागरिकांसाठी महापालिका स्तरावर आवश्यक सोयीसुविधांची पूर्तता करावी, कार्यक्रमाची संपूर्ण शहरभर प्रभावी प्रचार प्रसिद्धी करावी तसेच जास्तीत जास्त नागरिकांना सहभागी होण्यासाठी आवाहन करावे, असेही मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. विशेषतः सिख, सिकलकर, बंजारा, लबाना, सिंधी, मोहियाल, वाल्मिकी, उदासीन आणि भगत नामदेव परंपरा समाजाची लोकसंख्या ज्या भागांमध्ये अधिक आहे,

त्या भागांमध्ये विशेष जनजागृती मोहीम राबविण्याची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली. याशिवाय, या निमित्ताने शहरातील विविध ठिकाणी आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्याबाबतही सूचना यावेळी त्यांनी मांडली.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
शनिवार दिनांक 14/02/2026
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# साप्ताहिक व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही भरता येणार झोपडपट्टी सेवाकर

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी:- पिंपरी चिंचवड महापालिकेच्या झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभागामार्फत झोपडपट्टी सेवाकर वसुलीची मोहीम सुरू असून, नागरिकांच्या सोयीसाठी विभागाचे कार्यालय साप्ताहिक तसेच सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही सुरू ठेवण्यात येणार आहे. सेवाकर भरणा सुलभ व्हावा आणि नागरिकांची गैरसोय टळावी यासाठी ही विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. तरी झोपडपट्टीवासीयांनी या सुविधेचा लाभ घेऊन आपला सेवाकर तात्काळ भरावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.




महापौर रवि लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर व उपायुक्त अण्णा बोदडे यांच्या अधिपत्याखाली करदात्यांना ऑनलाईन तसेच ऑफलाईन पद्धतीने झोपडपट्टी सेवाकर भरण्याची सुविधा कार्यान्वित करण्यात आली आहे.

चालू आर्थिक वर्षातील झोपडपट्टी सेवाकर वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी विभागाकडून विशेष नियोजन करण्यात आले असून, नागरिकांना विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. सेवाकर बिलाच्या खालच्या उजव्या बाजूस देण्यात आलेल्या क्यूआर कोडद्वारे नागरिकांना घरबसल्या ऑनलाईन स्वरूपात सेवाकर भरता येणार आहे. त्यामुळे नागरिकांचा वेळ व श्रम वाचणार असून डिजिटल पद्धतीने कर भरण्यास चालना मिळणार आहे.

झोपडपट्टीवासीयांना कर भरण्यासाठी अधिक सोयीसुविधा उपलब्ध करून देणे ही महापालिकेची जबाबदारी आहे. डिजिटल माध्यमातून क्यूआर कोडद्वारे घरबसल्या सेवाकर भरण्याची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे नागरिकांचा वेळ व श्रम वाचणार आहेत. तरी ज्यांना ऑनलाईन पद्धतीने कर भरणे शक्य नाही अशा करदात्यांसाठी साप्ताहिक व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभागाचे कार्यालय सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. नागरिकांनी या सुविधेचा लाभ घेऊन वेळेत सेवाकर भरून शहराच्या विकासात आपला सहभाग नोंदवावा.

**रवि लांडगे**, महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

# पिं.चिं.स्मार्ट सिटी लिमिटेडच्या संचालकपदी भाऊसाहेब भोईर यांची नियुक्ती

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड शहराच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी आणि स्मार्ट सिटी संकल्पना अधिक प्रभावीपणे राबवण्यासाठी पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेड च्या संचालकपदी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे ज्येष्ठ नगरसेवक व विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांची आज नियुक्ती करण्यात आली.**



या नियुक्तीमुळे शहरातील स्मार्ट प्रकल्पांना गती मिळणार असून आधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे नागरिकांचे जीवनमान उंचावण्यावर भर देण्यात येणार आहे.या प्रसंगी डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे विभागीय आयुक्त, तसेच श्रावण हर्डीकर, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्त, यांच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.नियुक्तीनंतर व्यक्त केलेल्या भावना मांडताना भाऊसाहेब भोईर यांनी सांगितले की, “शहरातील वाहतूक, पायाभूत सुविधा, डिजिटल सेवा, पर्यावरणपूरक उपक्रम आणि नागरिककेंद्री सुविधा यांचा समन्वय साधत पिंपरी-चिंचवडला जागतिक दर्जाचे स्मार्ट शहर बनवण्यासाठी आम्ही सर्वजण कटिबद्ध आहोत.

”स्मार्ट सिटी अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांमध्ये ई-गव्हर्नन्स, स्मार्ट ट्रान्सपोर्ट, ऊर्जा कार्यक्षम व्यवस्था, सीसीटीव्ही-आधारित सुरक्षा, तसेच हरित व शाश्वत विकासावर विशेष लक्ष देण्यात येणार आहे.

या नियुक्तीमुळे Pimpri Chinchwad Municipal Corporation आणि स्मार्ट सिटी यंत्रणेतील समन्वय अधिक मजबूत होईल, असा विश्वास प्रशासनाकडून व्यक्त करण्यात आला आहे.

शहराच्या प्रगतीसाठी नव्या जबाबदारीची सुरुवात करताना, नागरिकांच्या अपेक्षांना न्याय देत पारदर्शक व परिणामकारक अंमलबजावणीवर भर दिला जाणार असल्याचेही यावेळी स्पष्ट करण्यात आले.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शनिवार दिनांक 14/02/२०२६

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# चिखली येथील पाणीपुरवठा तातडीने सुरळीत करा –यश साने

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रभाग क्रमांक १ मधील चिखली परिसरात नागरिकांना कमी दाबाने व दूषित पाणीपुरवठा होत असल्याची गंभीर तक्रार समोर आली आहे. याबाबत नगरसेवक यश दत्ता काका साने यांनी महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांकडे अधिकृत निवेदनाद्वारे तक्रार नोंदवली आहे.**



साने यांनी सांगितले की, संपूर्ण परिसरात अत्यंत कमी दाबाने पाणी येत असून काही भागात दूषित पाणीपुरवठा होत आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर सर्व संबंधित पाईपलाईनची तातडीने तपासणी करून गळती, तुटलेले जोड किंवा इतर तांत्रिक त्रुटी शोधून दुरुस्त कराव्यात, अशी मागणी त्यांनी केली आहे.तसेच, पाण्याच्या गुणवत्तेची सखोल तपासणी करून आरोग्यदायी व स्वच्छ पाणीपुरवठा सुरळीत करण्यात यावा, अशी ठाम मागणी यश साने यांनी केली आहे.

दूषित पाणीपुरवठा त्वरित थांबवून नागरिकांना नियमित व योग्य दाबाने पाणी मिळावे, यासाठी प्रशासनाने तातडीची कारवाई करावी, असेही त्यांनी निवेदनात नमूद केले आहे.

# ऑनलाईन धमकी व सायबर फसवणुकीद्वारे 11 लाखांची खंडणी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

ऑनलाईन माध्यमातून धमकी देत सायबर फसवणूक करून तब्बल ११ लाख रुपयांची खंडणी उकळल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे.




याप्रकरणी संबंधित आरोपींविरोधात भारतीय न्याय संहिता तसेच माहिती तंत्रज्ञान (सुधारित) कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादीनुसार, दिनांक २१ नोव्हेंबर २०२४ ते ०६ डिसेंबर २०२४ या कालावधीत फिर्यादी पुण्यातील सोसायटीत राहत असताना अज्ञात व्यक्तींनी विविध मोबाईल क्रमांकांवरून वारंवार कॉल व व्हॉट्सअॅपद्वारे संपर्क साधला.आरोपींनी स्वतःला मुंबई क्राईम ब्रँचमधील अधिकारी असल्याचे भासवून फिर्यादी व त्यांच्या वडिलांना धमकावले. आधारकार्ड, बँक खाते, एटीएम कार्ड बनावट केल्याचा आरोप करत तात्काळ कारवाई व अटकेची भीती दाखवण्यात आली.

तसेच सुप्रीम कोर्टाच्या फंडासाठी रक्कम जमा केल्यास अटक टाळता येईल, असे सांगून आरोपींनी वेगवेगळ्या बँक खात्यांमध्ये पैसे भरण्यास भाग पाडले. या धमकी आणि मानसिक दबावामुळे फिर्यादीच्या वडिलांकडून एकूण ११ लाख रुपये ऑनलाईन ट्रान्सफर करण्यात आले.नंतर हा प्रकार फसवणूक असल्याचे लक्षात आल्यानंतर फिर्यादीने पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या प्रकरणी संबंधित मोबाईल क्रमांक, बँक खाती आणि इतर तांत्रिक पुराव्यांच्या आधारे तपास सुरू असून सायबर पोलिसांकडून आरोपींचा शोध घेतला जात आहे.

सायबर फसवणुकीच्या वाढत्या घटनांमुळे नागरिकांनी अशा धमकीच्या कॉल्सना बळी न पडता त्वरित पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शनिवार दिनांक 14/02/२०२६

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# थेरगाव मध्ये मोकळ्या भूखंडावर डम्पिंग

## नगरसेवकांकडून पाहणी, कारवाईची मागणी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**थेरगाव येथील रुणावल क्लासिक व मंगलदीप सोसायटीसमोरील मोकळ्या जागेत मोठ्या प्रमाणात रॉ मटेरियल, मुरूम, दगड व कचऱ्याचे डोंगर साठवून रात्रीच्या वेळी डम्पिंग केले जात असल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकारामुळे आजूबाजूच्या सोसायट्यांतील नागरिकांना विशेषतः रात्री मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. मात्र संबंधितांवर कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याची तक्रार स्थानिकांनी केली आहे.**



सदर बाब प्रभाग क्र. २३ चे नगरसेवक अभिषेक बारणे, तानाजी बारणे व नगरसेविका मनीषा पवार यांच्या निदर्शनास आणून देण्यात आली. तात्काळ नगरसेवकांनी ग क्षेत्रीय कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त किशोर ननावरे, आरोग्य विभाग व पर्यावरण विभागाच्या अधिकाऱ्यांसह परिसराची पाहणी केली. संबंधित डम्पिंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी व तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी यावेळी करण्यात आली. यावेळी सामाजिक कार्यकर्त्या सोनाली गाडे व संदीप गाडे, सनी बारणे उपस्थित होते.पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात 'स्वच्छ भारत अभियान' प्रभावीपणे राबवले जात असल्याचे सांगितले जाते. सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे अथवा घाण केल्यास दंडात्मक कारवाईची तरतूद असताना, मोकळ्या भूखंडावर मोठ्या प्रमाणात कचरा साठवला जात असल्याने स्थानिक नागरिकांमध्ये संतापाची भावना व्यक्त होत आहे.

नागरिकांनी प्रशासनाने तातडीने लक्ष घालून परिसर स्वच्छ करावा व दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.

# महापौर रवि लांडगे यांची वायसीएम रुग्णालयास भेट

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी :- पिंपरी चिंचवड महापालिकेचे महापौर रवि लांडगे यांनी आज यशवंतराव चव्हाण स्मृती पदव्युत्तर संस्था आणि रुग्णालयाला भेट देऊन विविध विभागांची सर्वंकष पाहणी केली.

महापालिका क्षेत्रातील सर्वात मोठ्या आणि महत्त्वपूर्ण रुग्णालयांपैकी एक असलेल्या या संस्थेत नागरिकांना दिल्या जाणाऱ्या उपचारप्रक्रिया, सुविधा, मनुष्यबळ आणि रुग्णालयातील एकूण व्यवस्थेचा महापौरांनी प्रत्यक्ष आढावा घेतला.



महापौरांनी आपत्कालीन विभाग, आयसीयू, जनरल आणि स्पेशालिटी वार्ड, शस्त्रक्रिया विभाग, प्रयोगशाळा, रेडिओलॉजी, फार्मसी, नोंदणी कक्ष तसेच वैद्यकीय शिक्षणाशी निगडित विभागांना भेट देऊन संबंधित डॉक्टर व अधिकाऱ्यांसोबत संवाद साधला. रुग्णालयातील दैनंदिन कामकाज, उपचारांची गती, उपलब्ध उपकरणांची स्थिती, विद्यार्थी–डॉक्टर प्रशिक्षण प्रक्रिया आणि नागरिकांना मिळणाऱ्या सेवा यासंबंधी सविस्तर माहिती महापौरांना देण्यात आली.यावेळी महापौरांनी डॉक्टर, वैद्यकीय अधिकारी, परिचारिका आणि प्रशासकीय कर्मचाऱ्यांशी संवाद साधून कामकाजातील आव्हाने, गरजा, उपलब्ध संसाधने आणि रुग्णसेवांबाबत त्यांचे अनुभव जाणून घेतले.

### महापौरांनी साधला रुग्णांशी थेट संवाद

महापौरांच्या भेटीदरम्यान रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांशी प्रत्यक्ष संवाद साधण्यावर विशेष भर देण्यात आला. महापौर रवि लांडगे यांनी वार्डांमध्ये जाऊन रुग्णांच्या उपचारप्रक्रियेबद्दल, डॉक्टर व परिचारिकांकडून मिळणाऱ्या सेवांबद्दल, स्वच्छता, औषधोपचार तसेच रुग्णालयातील एकूण वातावरणाबद्दल त्यांची मते जाणून घेतली. अनेक रुग्णांनी वेळेत मिळणारे उपचार, कर्मचाऱ्यांचा सहकार्यभाव आणि आवश्यक सुविधांची उपलब्धता याबाबत समाधान व्यक्त केले, तर काहींनी सुधारणा आवश्यक असलेल्या बाबीही स्पष्टपणे मांडल्या.महापौरांच्या या पाहणी दौऱ्यादरम्यान आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, वायसीएम रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे, अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार, नोडल ऑफिसर डॉ. छाया शिंदे तसेच विविध विभागांचे अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, डॉक्टर, परिचारिका आणि इतर कर्मचारी उपस्थित होते.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 89999 48968